सणांच्या काळात रेल्वेकडून ७ विशेष गाड्या

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून विविध मार्गांवर ७ विशेष गाड्यांच्या २१६ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत.

या गाड्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात सोडण्यात येणार आहेत. उत्तर भारताकडे जाणारी हडपसर-गाझीपूर-हडपसर सिटी, नागपूर-हडपसर-नागपूर सुपरफास्ट या विशेष गाड्या आठवड्यातून दोन वेळा सोडण्यात येणार आहेत. तर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी)-कोल्हापूर-सीएसएमटी, नागपूर-हडपसर-नागपूर सुपरफास्ट आणि पुणे-न्यू अमरावती-पुणे या विशेष गाड्या आठवड्यातून एकदा सोडण्यात येणार आहेत. तसेच, हडपसर-गोरखपूर-हडपसर दैनिक विशेष गाडी आणि शुक्रवार वगळून कोल्हापूर-कलबुर्गी-कोल्हापूर दैनिक विशेष गाडी सणासुदीच्या कालावधीत चालविण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून देण्यात आली.

या विशेष गाड्यांचे तिकीट सर्व संगणकीकृत प्रवासी आरक्षण प्रणाली केंद्रांवर आणि 'आयआरसीटीसी'च्या संकेतस्थळावर विशेष शुल्कासह आरक्षित करता येणार असून, अनारक्षीत डब्यांसाठी यूटीएस प्रणाली, ॲप किंवा बुकिंग काउंटरद्वारे तिकीट मिळवता येणार आहे.

प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी मार्गावरील आपल्या गाडीचे आगमन आणि प्रस्थानाविषयीच्या सविस्तर वेळांची माहिती एनटीईएस ॲप किंवा रेल्वे चौकशी संकेतस्थळाद्वारे तपासून घ्यावी, असे आवाहनही मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

देशातील 'ड्रोन'निर्मितीला पाठबळ

'एआरएआय'कडून प्रमाणीकरणाची सुविधा; रचनेपासून उड्डाणापर्यंत सर्व बाबींची तपासणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

पुणे : मानवरहित विमान यंत्रणा म्हणजेच ड्रोनच्या प्रमाणीकरणाची सुविधा सुरू करण्याची घोषणा 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया'ने (एआरएआय) केली आहे. देशात कृषीपासून मालवाहतूक, खाणकाम, संरक्षण क्षेत्रापर्यंत ड्रोनची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याभूमे देशांतर्गत ड्रोन निर्मिती क्षेत्राचा विस्तार होत असून, 'एआरएआय'कडून आता जलद प्रमाणीकरण होणार असल्याने या क्षेत्राच्या वाढीला आणखी गती मिळणार आहे.

'देशात गेल्या काही वर्षांत ड्रोननिर्मिती क्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. केंद्र सरकारनेही ड्रोन आणि त्याच्या सुट्या भागांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहनपर सवलत योजना लागू केली आहे. कृषी, पायाभूत सुविधा, मालवाहतूक, खाणकाम, आपत्ती व्यवस्थापन आणि संरक्षण क्षेत्रात ड्रोनची मागणी मोठ्या प्रमाणात वाढ आहे. त्यामुळे ड्रोनची रचना, बांधणी आणि कार्यक्षमता तपासण्यासाठी प्रमाणीकरण संस्थांची गरज निर्माण झाली होती. आता 'एआरएआय'ही गरज पूर्ण करणार असून, ड्रोननिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना ड्रोनची प्राथमिक रचना ते अंतिम प्रमाणीकरण या टप्प्यांवर मदत केली जाणार आहे. त्यामुळे ड्रोननिर्मितीपासून ते बाजारात येण्याचा कालावधी कमी होणार आहे. ड्रोननिर्मिती कंपन्यांना 'एआरएआय'च्या ड्रोन सर्टिफिकेशन पोर्टलवर अर्ज करण्यापासूनच्या सर्व प्रक्रियेची माहिती उपलब्ध होईल,' अशी माहिती 'एआरएआय'ने दिली आहे.



देशातील ड्रोन परिसंस्था ही वेगाने विकसित होत असून, तिला तंत्रज्ञानातील नवोपक्रमाचे पाठबळ मिळत आहे. त्यातून या क्षेत्रात नवीन संधी निर्माण होत आहेत. देशासाठी सुरक्षित आणि नियामक चौकटीसह नावीन्यतेवर आधारित ड्रोन परिसंस्था निर्माण करण्याचा आमचा उद्देश आहे. त्यातून देशात विश्वासार्ह ड्रोन तंत्रज्ञान विकसित होऊन या क्षेत्रात सुरक्षा आणि कामगिरीची उच्च मानके स्थापन होतील.

- डॉ. रेजी मथाई, संचालक, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया

दोन टप्प्यांवर मूल्यमापन

'ड्रोनचे प्रमाणीकरण करताना दोन टप्प्यांवर मूल्यमापन करण्यात येणार आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात कागदपत्रांच्या वैधतेची तपासणी करण्यात येईल. यात ड्रोनची रचना, तांत्रिक वैशिष्ट्ये आणि सुरक्षितता या बाबतच्या कागदपत्रांचा समावेश असेल. दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष ड्रोनची तपासणी करण्यात येईल. यात ड्रोनच्या उड्डाणाची चाचणी घेऊन त्याची कामगिरी, स्थिरता आणि नियामक चौकटीतील बाबींची पूर्तता तपासण्यात येईल. या दोन टप्प्यांवरील मूल्यमापन यशस्वी झाल्यानंतर नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाचे प्रमाणीकरण ड्रोनला उपलब्ध होईल. याबरोबर या ड्रोनला विशिष्ट क्रमांकही मिळेल,' असे 'एआरएआय'चे स्पष्ट केले.

खंडणीप्रकरणी 'रीलस्टार'ला अटक

पुणे : पुणे कटक मंडळातील निवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांवर पाच लाख रुपयांच्या खंडणीसाठी हल्ला केल्याप्रकरणी रीलस्टार दिव्या शिंदे हिला अटक करण्यात आली असून, तिच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दिव्याला ३० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिव्या शिंदे (रा. सनसिटी रस्ता, सिंहगड रस्ता) हिला अटक करण्यात आली आहे. तिच्या आठ ते दहा साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या बाबत पुणे कटक मंडळातील निवृत्त मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार २०२१ मध्ये निवृत्त झाले. ते एका स्वयंसेवी संस्थेचे सदस्य आहेत. या संस्थेकडून १ ते ३ सप्टेंबर दरम्यान कला आविष्कार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शिंदे हिला संबंधित संस्थेकडून अधिकृत आमंत्रण देण्यात आले नव्हते. या कार्यक्रमाची प्रसिद्धी समाजमाध्यमातून केल्याचे सांगून शिंदे हिने तक्रारदारांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून पैशांची मागणी केली. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी शिंदे आणि साथीदार तक्रारदाराच्या निवासस्थानी गेले. त्या वेळी ते तेथे नव्हते. तेव्हा शिंदे आणि साथीदारांनी पत्नी आणि मुलाला दमदाटी केली. त्यानंतर २३ सप्टेंबर रोजी तिने तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. लष्कर भागातील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये त्यांना बोलविले. तेथे त्यांना धमकावून पाच लाख रुपये मागितले. २४ सप्टेंबर रोजी रात्री तक्रारदाराच्या एकटे घरी होते. त्या वेळी शिंदे आणि साथीदार तेथे आले. घरात शिरून तक्रारदाराला मारहाण केली.सहायक पोलीस निरीक्षक अमित शेटे तपास करत आहेत.

मटण, मासळी, चिकनला खवय्यांकडून मागणी

तीन महिन्यांनंतर रविवारी खरेदीसाठी बाजारात गर्दी

पुणे : गणेशोत्सवानंतर मटण, मासळी, चिकनच्या मागणीत वाढ झाली. रविवारी मटण, मासळी, चिकन खरेदीसाठी सांमिष खवय्यांची गर्दी झाली होती. 'अधिक मास, श्रावण मास, तसेच गणेशोत्सवात मटण, मासळी, चिकनला मागणी नव्हती. गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर रविवारी खरेदीसाठी गर्दी झाली होती.

रविवारी सकाळपासून सांमिष खवय्यांनी मटण, मासळी, चिकन खरेदीसाठी गर्दी केली होती. आषाढ महिन्यात सांमिष खवय्यांकडून मागणी होती. त्यानंतर अधिक मास, श्रावण मास आला. अधिक मास, श्रावण मासात सांमिष पदार्थ वर्ज्य मानले जातात. श्रावण महिन्याची सांगता झाल्यानंतर गणेशोत्सवास सुरुवात झाली. गेले तीन महिने सांमिष खवय्यांचा हिरमोड झाला होता. गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर पितृपक्षास सुरुवात होते. पितृपक्षात सांमिष पदार्थांचे सेवन केले जाते. त्यानंतर नवरात्रोत्सवात सांमिष पदार्थ वर्ज्य केले जातात. मटणाचे दर स्थिर राहिले', अशी माहिती पुणे शहर मटण दुकानदार संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी दिली.

'गणेशोत्सवानंतर मासळी, मटण, चिकनच्या मागणीत वाढ झाली आहे. रविवार असल्याने खरेदीसाठी मासळी बाजारात गर्दी झाली होती. गेल्या आठवड्याच्या तुलनेत मासळीच्या मागणीत दीडपट वाढ झाली. पापलेट, रावस या मासळीचे दर तेजीत आहेत. उर्वरित मासळीचे दर स्थिर आहेत. रविवारी गणेश पेठेतील मासळी बाजारात खोल समुद्रातील मासळी १५ ते २० टन, नदीतील मासळी ४०० ते ५०० किलो, खाडीतील मासळी २०० ते ३०० किलो, तसेच आंध्र प्रदेशातून १० ते १५ टन रहू, कतला, सीलन या मासळीची आवक झाली,' असे गणेश पेठ मासळी बाजारातील व्यापारी ठाकूर परदेशी यांनी दिली.

मटण, मासळी, चिकनचे किलोचे दर

पापलेट	८०० ते २००० रुपये
हलवा	६०० ते ७०० रुपये
सुरमई	४०० ते ७०० रुपये
कोळंबी	७५० ते १४० रुपये
मटण	८४० रुपये
चिकन	२२० रुपये
गावरान अंडी (डझन)	९५६ रुपये
इंग्लिश अंडी (डझन)	७८ रुपये

चिकनच्या दरात किलोमागे २० रुपयांनी वाढ

'गेल्या आठवड्याच्या तुलनेत चिकनच्या दरात किलोमागे २० रुपयांनी वाढ झाली. गणेशोत्सवानंतर रविवार आल्याने चिकनच्या मागणीत मोठी वाढ झाली. इंग्लिश अंड्याचे दर स्थिर राहिले. गावरान अंड्याच्या दरात शेकड्यामागे ४० रुपयांनी वाढ झाली,' असे पुणे शहर बॉयलर असोसिएशनचे संचालक रूपेश परदेशी यांनी सांगितले.

कलाविष्कारामध्ये गायक-श्रोता संवाद महत्त्वाचा

आरती अंकलीकर-टिकेकर यांचे मत



लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'शास्त्रीय संगीताचा प्रवास हा खडतर आणि खाचखळग्यांचा असतो. त्यात गुरुजनांबरोबरच कधीतरी धडपडून, खरचटून घरी आल्यावर मलमपट्टी करणारे कुटुंबीय मोलाचे असतात. माझ्या यशात कुटुंबीयांसह शिष्य आणि रसिकांचादेखील मोलाचा वाटा आहे. श्रोत्यांची दाद आणि प्रतिसादाशिवाय कुटुलाही कलाकार घडू शकत नाही. गायन ही सादरीकरणाची कला असल्यामुळे गायक आणि श्रोत्यांचा संवाद याला अतिशय महत्त्व आहे,' असे भावना गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांनी रविवारी व्यक्त केली.

गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशनच्या वतीने संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते आरती अंकलीकर-टिकेकर यांना स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. गायक पं. रघुनंदन पणशीकर, अभिनेते उदय टिकेकर, गानवर्धनचे अध्यक्ष दयानंद घोटकर, नातू फाउंडेशनचे अध्यक्ष शारंग नातू, डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी. या वेळी उपस्थित होत्या. 'गानवर्धन' आणि 'स्वरमयी गुरुकुल' आयोजित आंतरराष्ट्रीय स्वरप्रभा गायन प्रतियोगितेमध्ये यश संपादन केलेल्या विजेत्या कलाकारांना आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

आरती अंकलीकर-टिकेकर म्हणाल्या, 'गायकाने प्रतिभा घेऊनच जन्माला यावे लागते. त्याच्याकडे तळमळ तसेच प्रतिभेला साजेसा स्वभाव असणे आवश्यक असते. असे घडल्यास कलाकाराला गाणे आत्मसात होऊ लागते. आम्हा गायकांना आनंद आणि प्रेरणा देणाऱ्या डॉ. प्रभा अत्रे यांच्या नावे मिळालेला पुरस्कार अतिशय आनंददायी आहे. त्यांचे गाणे ऐकल्यानंतर तानपुरा काढून रियाजाला बसत स्वरांचा मागोवा घेण्याची इच्छा निर्माण होते.'

डॉ. मोरे म्हणाले, 'गानवर्धन संस्था संगीताचा गोवर्धन पर्वत उचलण्याचे कार्य करत आहे. गेली काही दशके जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेगाने विकास होत आहे. याचा उपयोग सांगीतिक क्षेत्रातील कलाकारांनाही होत आहे. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता हे वरदान आहे, की शाप याचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे.'

'डॉ. प्रभा अत्रे यांच्या नावाचा पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांच्यासारख्या बुद्धिमान गायिकेला मिळणे हे अतिशय आनंददायी आहे,' असे पणशीकर यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले. प्राची घोटकर यांनी एम. डी. या वेळी उपस्थित होत्या. आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या गायनातून 'मारुबिहाग' रागाचे सौंदर्य उलगडले. त्यांना अभिनय रवंदे (संवादिनी), विभव खांडोळ्कर (तबला), जान्हवी गद्रे, अनुराधा मंडलिक (तानपुरा, सहगायन) यांनी साथसंगत केली.

सफाई कर्मचाऱ्यास अत्याचाराबद्दल अटक

पुणे : बारा वर्षीय मुलीवर सफाई कर्मचाऱ्याने अत्याचार केल्याप्रकरणी सफाई कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. आरोपी पुणे महापालिकेत कंत्राटी पद्धतीवर काम करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी जयसिंग भानुदास साठे (वय ५२, रा. कामगारनगर, विश्रांतवाडी) याला अटक करण्यात आली. या बाबत पीडित मुलीच्या आईने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. साठे याच्याविरुद्ध अत्याचार, बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साठे याने बारा वर्षीय मुलीवर अत्याचार केला होता.

२२ सप्टेंबर रोजी पीडित मुलीची आई तिला घेऊन रुग्णालयात तपासणीसाठी गेली होती. या वेळी तपासणीत मुलीवर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले. वैद्यकीय तज्ज्ञांनी या बाबतची माहिती विश्रांतवाडी पोलिसांना दिली. १२ सप्टेंबर रोजी साठेने मुलीवर अत्याचार केल्याची माहिती चौकशीत मिळाली. पोलिसांनी मुलीच्या आईचा जबाब नोंदवून घेतला.

विसर्जन मिरवणुकीत अखंड वीजपुरवठा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : लक्ष्मी रस्त्यावरील गणेश विसर्जन मिरवणुकीसह खडकी, शिवाजीनगर, गावठाण, वडारवाडी, रामोशीवाडी, गोखलेनगर, सुसगाव आदी परिसरात विक्रमी गर्दी असूनही, वीजपुरवठा अखंडित आणि सुरक्षित राखण्यात महावितरणला यश मिळाले.

विसर्जन मिरवणुकीपूर्वीच महावितरणकडून पूर्वनियोजन, प्रतिबंधात्मक देखभाल, तांत्रिक तपासणी आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. मिरवणूक सुरू झाल्यानंतर महावितरणच्या पुणे विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. त्यामुळे वीजपुरवठ्यात अडथळा निर्माण झाला नाही, असे महावितरणकडून निवेदनाद्वारे कळविण्यात आले.

या संपूर्ण नियोजनासाठी महावितरणच्या पुणे विभागाचे प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड आणि कार्यकारी अभियंता घिटे यांनी मार्गदर्शन कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता भिवसानी आणि मोदी गणपती शाखेच्या शाखा अभियंता सेगलारू यांनी मिरवणुकीदरम्यान महत्त्वाची भूमिका बजावली.

दरम्यान, महावितरणचे अधिकारी अधिकारी दिनेश अग्रवाल यांनी महावितरणच्या नियंत्रण कक्षाला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. शिवाजीनगरगणेशखिंड उपविभागाच्या वतीने अतिरिक्त कार्यकारी अभियंता अमित भरते यांनी आभार मानले.

LOST SHARE CERTIFICATE

शेअर सर्टिफिकेट हरवल्याची जाहीर नोटीस याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, श्री. देवराज निर्मल बॅनर्जी हे कॉर्प सहकारी गृह रचना संस्था मर्यादित, नोंदणी क्रमांक PNA/HSG/229 दिनांक 21-10-1965, संचय, 397-अ, सोमवार पेठ, सरस्वत कॉलनी समोर, पुणे-411001 येथील फ्लॅट क्रमांक 16 चे नोंदणीकृत सभासद आणि रहिवासी आहेत.सदर फ्लॅट क्रमांक 16 संदर्भात संस्थेने वितरित केलेले मूळ शेअर सर्टिफिकेट हरवले/गहाळ झाले असून सखोल शोध घेऊनही मिळून येत नाही. याबाबतची तक्रार पोलीसाकडे ऑनलाईन दाखल करण्यात आली आहे.सदर शेअर्स किंवा मूळ शेअर सर्टिफिकेटबाबत कोणाचा काही हक्क, अधिकार, स्वामित्व, हितसंबंध किंवा आक्षेप असल्यास किंवा सदर सर्टिफिकेट कोणास सापडल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 14 (चौदा) दिवसांच्या आत संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांना वरील पत्त्यावर लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा संस्थेमार्फत श्री. देवराज निर्मल बॅनर्जी यांच्या नावे डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सही/- देवराज निर्मल बॅनर्जी
फ्लॅट नं. 16, कॉर्नर सहकारी गृह रचना संस्था मर्यादित, संचय, 397-अ, सोमवार पेठ, पुणे - 411001

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra

वसुली विभाग : कॉर्पोरेट कार्यालय : मॉन्टव्हर्डे, 134/1, बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण, पुणे-411 021. फोन : 020-71658226
ई-मेल : dgmrecovery1@bankofmaharashtra.bank.in; agmsamv@bankofmaharashtra.bank.in
वेबसाईट : www.bankofmaharashtra.bank.in

बँकेच्या अनुत्पादक मालमत्तांची पात्र खरेदीदारांना (एआरसीज/ बँका/ एनबीएफसीज/एफआयएल) ई ऑक्शनद्वारे विक्री.

बँक ऑफ महाराष्ट्र एआरसीज, बँका, एफआयएल आणि पात्र एनबीएफसीज यांच्याकडून फक्त 100% रोख खरेदी या आधारावर फक्त अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) खाते जे **मेसर्स सिद्धस् ज्वेलर्स प्रा. लि. (रोखीत किंमत रु 20.58 कोटी)** याचे आहे आणि एकूण येणे बाकी, ज्यात आमचा हिस्सा रु. 20.71 कोटी (रुपये वीस कोटी एकाहत्तर लाख फक्त) ही रक्कम दिनांक **05.08.2026** रोजी आहे, त्याची विक्री ई ऑक्शन द्वारे **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे काही आहे आणि फेरविचार नाही या तत्वावर** करु इच्छित आहे.
सर्व इच्छुक पात्र सहभागीना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अभिव्यक्तीचे प्रकटीकरण (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) म्हणजे तयारीचे प्रकटीकरण सादर करावे आणि त्यानंतर काही उपरह करण्यात येणार नाही असा करार केल्यानंतर, जो अगोदर करण्यात आलेला नसेल तर (वेब नोटीसीत नमूद करण्यात आलेल्या वेबेनुसार) तसा इमेल आयडी **dgmrecovery1@bankofmaharashtra.bank.in, agmsamv@bankofmaharashtra.bank.in** वर सादर करावा कृपया अधिक तपशील हया असेल तर, बँकेची वेबसाइट **www.bankofmaharashtra.bank.in** वरील लिंक "Assets for sale → Properties for sale" पहावी (वेब नोटिस)
कृपया याची नोंद घ्यावी की, बँकेने कोणतेही कारण न देता प्रस्तावित ई-ऑक्शन रद्द करणे आणि ई ऑक्शनाची तारीख बदलणे किंवा कुठल्याही टप्प्यावर के वळ **www.bankofmaharashtra.bank.in** वरील लिंक "Assets for sale → Properties for sale" अंतर्गत शुद्धीपत्रक देऊन बदल करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. बँकेचा या संदर्भात निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

स्थळ : पुणे
दिनांक : 28.09.2026

जारीकर्ता
महाप्रबंधक
(वसुली आणि कायदा विभाग)

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra

वसुली विभाग : कॉर्पोरेट कार्यालय : मॉन्टव्हर्डे, 134/1, बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण, पुणे-411 021. फोन : 020-71658226
ई-मेल : dgmrecovery1@bankofmaharashtra.bank.in; agmsamv@bankofmaharashtra.bank.in
वेबसाईट : www.bankofmaharashtra.bank.in

बँकेच्या अनुत्पादक मालमत्तांची पात्र खरेदीदारांना (एआरसीज/ बँका/ एनबीएफसीज/एफआयएल) ई ऑक्शनद्वारे विक्री.

बँक ऑफ महाराष्ट्र एआरसीज, बँका, एफआयएल आणि पात्र एनबीएफसीज यांच्याकडून फक्त 100% रोख खरेदी या आधारावर फक्त अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) खाते जे **मेसर्स पूजा डायग एल एल पी (रोखीत किंमत रु 43.13 कोटी)** याचे आहे आणि एकूण येणे बाकी, ज्यात आमचा हिस्सा रु.44.10 कोटी (रुपये चव्वेचाळीस कोटी दहा लाख फक्त) ही रक्कम दिनांक 05.08.2026 रोजी आहे, त्याची विक्री ई ऑक्शन द्वारे **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे काही आहे आणि फेरविचार नाही या तत्वावर** करु इच्छित आहे.
सर्व इच्छुक पात्र सहभागीना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अभिव्यक्तीचे प्रकटीकरण (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) म्हणजे तयारीचे प्रकटीकरण सादर करावे आणि त्यानंतर काही उपरह करण्यात येणार नाही असा करार केल्यानंतर, जो अगोदर करण्यात आलेला नसेल तर (वेब नोटीसीत नमूद करण्यात आलेल्या वेबेनुसार) तसा इमेल आयडी **dgmrecovery1@bankofmaharashtra.bank.in, agmsamv@bankofmaharashtra.bank.in** वर सादर करावा कृपया अधिक तपशील हया असेल तर, बँकेची वेबसाइट **www.bankofmaharashtra.bank.in** वरील लिंक "Assets for sale → Properties for sale" पहावी (वेब नोटिस)
कृपया याची नोंद घ्यावी की, बँकेने कोणतेही कारण न देता प्रस्तावित ई-ऑक्शन रद्द करणे आणि ई ऑक्शनाची तारीख बदलणे किंवा कुठल्याही टप्प्यावर के वळ **www.bankofmaharashtra.bank.in** वरील लिंक "Assets for sale → Properties for sale" अंतर्गत शुद्धीपत्रक देऊन बदल करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. बँकेचा या संदर्भात निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

स्थळ : पुणे
दिनांक: 28.09.2026

जारीकर्ता
महाप्रबंधक
(वसुली आणि कायदा विभाग)

